# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक २३.०५.२०२२ (सोमवार)

...........................................................................................................

## घरफोडी

पोस्टे खापरखेडा :— अंतर्गत वार्ड नं ०१ जयभोले नगर चनकापुर ०२ कि.मी.पश्चिम. यातील फिर्यादी हा दिनांक २२/०५/२२ चे दुपारी ०१/०० वा त्याची पत्नीसह कळमेश्वर येथे लग्नाकरीता गेले असता लग्न आटोपुन त्याच दिवशी दुपारी ०३/५० वा घरी परत आले असता, घराचे दाराचे कुलुप तुटलेले दिसले, आत प्रवेश केल्यावर बेडरूम मध्ये ठेवलेली लोखंडी आलमारीचे लॉक तुटलेले दिसले, अलमारी चे लॉकर चेक केले असता, **लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व नगदी ४५,०००/— रू असा एकुण ५८,०००/— रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिनेश नारायण रहांगडाले वय ४४ वर्ष रा. वार्ड नं ०१ जयभोले नगर चनकापुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास तपास सहायक फौजदार श्री जाधव पोस्टे खापराखेडा मो नं ९९२३१०४३१० हे करीत आहे.

## कोळसा चोरी करणा—या आरोपीतांविरूध्द कारवाई

पोस्टे कन्हान :— अंतर्गत दिनांक २२/५/२०२२ रोजी भाटीया कोळवासरी १० किमी उत्तर. येथे फिर्यादी हे आपले डब्ल्यु सी.एल.चे कर्मचारी यांच्या सोबत गोंडेगाव डब्ल्यु सी.एल येथे पेट्रोलिग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली की, गोंडेगाव वस्तीच्या मागुन चोरीचा कोळसा भरून येत आहे. असे खबरेवरून फिर्यादी व त्याचे कर्मचा—यांनी पकडुन कोळसा बाबत आरोपी दोन्ही ट्रक चालकांना विचारपुस केली असता, सदर कोळसा हा त्यांचे मालकांचे सांगीतल्यावरून ट्रक मध्ये भरला आहे, असे सांगितल्याने खालील प्रमाणे माल आरोपीतांचे ताब्यातुन जप्त केला.

**१. ट्रक क्र आर.जे —०९—जी.बी.—९३७०, २. ट्रक क्र एम.एच.—४०—बी.जी.—५३४३ एकुण किमती ३५,००,०००/— रू व कोळसा २२ टन कि. २,२०,०००/रू असा एकुण ३६,२०,०००/रू चा माल जप्त केला.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नागनाथ चरनदास खोब्रागडे वय ४० रा गोंडेगाव कॉलनी १८/१८ कन्हान यांचे रिपोर्टवरून पोस्टे कन्हान येथे आरोपी नामे—१) भैरवसिंग रामसिंग चौव्हान वय ४० रा पोलुखेडी जि. रतनाम रा मध्यप्रदेश २) फारूख अब्दुल्ला शेख रा कांद्री कन्हान ३) दिपक रमेश भुवनेश्वर रा खपरखेडा ४) उमेश पानतावने रा कांद्री कन्हान यांचे विरूध्द कलम ३७९,१०९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनीरीक्षक श्री महादेव सुरजुसे मो क्र ७६६६६४०२१८ हे करीत आहे

## निष्काळजीपणे वाहन चालवुन नुकसान

**पो.स्टे. बोरी :–** अंतर्गत उमरेड बायपास रोड १ कीमी दक्षिण. येथे दिनांक २१.०५.२२ चे २३.०० वा ते २३.४० वा दरम्यान यातील फिर्यादी यांची ट्रक क्र डी झेट ४६४६ ही नागपुर येथुन हिंगणघाट कडे निघाले असता, बुटीबोरी च्या समोर हायवे रोडवरून जांताना एका पांढ–या रंगाची स्वीफट गाडी क्र एम एच ३१ टी एफ ५२१२ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन चंद्रपुर रोडने बुटीबोरी कडे रॉग साईडने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला जख्मी केले व फिर्यादीचे वाहनाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – भोजराज विठोबाजी गेडाम वय ४८ वर्ष रा बोपापुर ता हिंगणघाट जि वर्धा रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपी नामे– अमोल राजेश काळे रा अवस्थी नगर पोलीस लाईन टाकळी नागपुर यांचे विरूध्द कलम २७९,३३७,३३८,४२७ भादवि सह कलम १८४,१२२, १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री भोयर पोस्टे बोरी मो क्र ९९२३१११२७० हे करीत आहे.

## पाण्यात उडी मारून आत्महत्या

**पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत मौजा आजनी शिवार यशवंत महाजन याचे शेतातील विहीरीत 4 कि.मी उत्तर, दिनांक 22/5/2022 चे 08/30 वा. दरम्यान यातील मृतक नामे – गोदाबाई हरिभाउ सहारे वय 80 वर्ष रा आजनी ता. सावनेर हीने पागलपणाचे भरात यशवंत महाजन याचे शेतातील विहीरीचा पाण्यात उडी घेवून पाण्यात बूडून मरण पावली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – वैभव सुरेश सहारे वय 22 वर्ष रा. आजनी ता. सावनेर यांचे रिपोर्टवरून पो स्टे सावनेर येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्गचा पुढील तपास पोलीस नाईक हावरे मो न 9923365622 करीत आहेत

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**